पुण्य नगरी
गुरुवार, ३० एप्रिल २०२६

# 'विवेकानंद'मध्ये राजेंद्र साळुंखे यांचा सेवा गौरव



कोल्हापूर : प्रतिनिधी

येथील विवेकानंद कॉलेजमधील राजेंद्र साळुंखे हे ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. यानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करत प्रशासकीय स्टाफच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात शिक्षण संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे आणि कोल्हापूर विभागप्रमुख डॉ. श्रीराम साळुंखे यांच्या हस्ते मानपत्र देऊन साळुंखे त्यांचा सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविक व स्वागत पतसंस्थेचे अध्यक्ष हितेंद्र साळुंखे यांनी केले, तर मानपत्राचे वाचन अमित साळुंखे यांनी केले. यावेळी बोलताना कौस्तुभ गावडे यांनी विवेकानंद संस्थेतील कार्यकर्ते हे एक कुटुंब असल्याचे सांगून, निष्ठेने केलेल्या सेवेमुळेच असा गौरव मिळतो, असे मत व्यक्त केले.

यावेळी प्रा. प्रकाश साळुंखे, भरत कवठेकर, राजकुमार देसाई, प्रतीक साळुंखे, अनिल पवार, डॉ. नीता पाटील, प्रा. मनीषा साळुंखे यांनी मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना राजेंद्र साळुंखे यांनी संस्थेमुळेच आपले जीवन घडले असून, मिळालेल्या सामाजिक सन्मानाबद्दल ते संस्थेचे आजन्म ऋणी राहतील, असे सांगितले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांनी सेवानिवृत्ती हा भावनिक टप्पा असल्याचे सांगून साळुंखे यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. आभार बबन करपे यांनी, तर सूत्रसंचालन अमर जाधव यांनी केले. कार्यक्रमास कर्मचारी, प्राध्यापक, नातेवाईक आणि मित्रपरिवार उपस्थित होता.

दैनिक
बातम्यांचा राजा
जनप्रवास
बातम्यांचा राजा
• गुरुवार
दि. ३० एप्रिल २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये राजेंद्र साळुंखे यांचा सेवा गौरव



**जनप्रवास : कोल्हापूर**

येथील विवेकानंद कॉलेजमधील राजेंद्र साळुंखे हे ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. या निमित्ताने त्यांचा प्रशासकीय स्टाफच्या वतीने प्रमुख पाहुणे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे आणि कोल्हापूर विभागप्रमुख डॉ. श्रीराम साळुंखे यांच्या हस्ते मानपत्र, शाल श्रीफळ, पोशाख देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात रोपास पाणी घालून झाली. प्रास्ताविक व स्वागत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या पतसंस्थेचे अध्यक्ष हितेंद्र साळुंखे यांनी केले. मानपत्राचे वाचन अमित साळुंखे यांनी केले. याप्रसंगी गावडे म्हणाले, विवेकानंद संस्थेतील सर्व गुरुदेव कार्यकर्ते हे एक कुटुंब आहे आणि आपण सर्वजण बापूजींचे वैचारिक वारसदार आहोत. सेवा बजावत असताना कामावर निष्ठा ठेवून काम करा, म्हणजे असा सेवागौरव होतो तसेच प्रामाणिकपणाच्या सेवेचे फळ मिळते. त्यांनी केलेल्या प्रामाणिक सेवेचा आदर्श इतरांनीही घ्यावा.

डॉ. श्रीराम साळुंखे म्हणाले, कुटुंबातील स्थान अबाधित ठेवणारे व्यक्तिमत्व म्हणजे राजेंद्र साळुंखे. त्यांनी दोन पिढ्यांमधील जिव्हाळा जपला. समाजात बापूजींच्या कार्याचा सन्मान वाढवण्याचे काम त्यांनी केले आहे. यावेळी प्रा. प्रकाश साळुंखे, भरत कवठेकर, राजकुमार देसाई, प्रतीक साळुंखे, अनिल पवार, डॉ. नीता पाटील, प्रा. मनीषा साळुंखे यांनी मनोगते मांडली.

प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांनी सेवानिवृत्ती हा भावनिक क्षण असल्याचे सांगून शुभेच्छा दिल्या. आभार बबन करपे यांनी तर सूत्रसंचालन अमर जाधव यांनी केले.

**संस्थेचा आजन्म ऋणी राहीन...**

सत्काराला उत्तर देताना राजेंद्र साळुंखे म्हणाले, या विवेकानंद शिक्षण संस्थेमुळे माझे जीवन घडले. मला सामाजिक मान सन्मान मिळाला, माझे कुटुंब स्वावलंबी झाले, त्याबद्दल मी या संस्थेचा आजन्म ऋणी राहीन.

30/4/26